# 'सांगाती' अडचणीतील रुग्णांचा अन् वंचितांचाही!

**'मी एकदा एक हताश पैलवान पाहिला. असं काहीतरी झालं होतं, ज्यामुळे तो लढवय्या हतबल झाल्याचं मला जाणवलं. नंतर लक्षात आलं, त्याला खांद्याच्या दुखण्यानं बेजार केलंय... पण त्याहीपेक्षा त्याच्याभोवती निर्माण झालेल्या परिस्थितीनं त्याला व्यथित केलं, पराभूत केलं! आता हा पराभव कोणाचा? एकेकाळी राजाश्रय असलेल्या कुस्तीसारख्या रांगड्या खेळाचा भार उचलण्याइतपत सक्षम खांदे निर्माण करू न शकणाऱ्या समाजाचा की कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा?'... डॉ. सुजित निलेगावकर बोलत होते. त्यांच्या याच अस्वस्थतेतून निर्माण झालीय एक संस्था. अशाच प्रश्नांतून मार्ग काढणारी, वाट दाखवणारी अन् सोबत करणारीही!**



ज्योत पणतीची

घरात माणूस आजारी पडलं की त्याला कुठं न्यावं, कोण चांगलं उपचार करील, हे प्रश्न सर्वांत आधी प्रत्येक कुटुंबात उमटतात. बरं त्याचं उत्तर सापडलं, तरी नेमके चांगले उपचार होतीलच का, हा प्रश्न माणूस घरी येईपर्यंत अनुत्तरितच असतो. आपल्या माणसाला काय आजार झालाय इथपासून आपल्या शहरात त्यावर नेमकं कोण उपचार करू शकेल इथपर्यंत अनेक जण संभ्रमात असतात. नेमका हाच संभ्रम सोडविण्याच्या उद्देशानं डॉ. सुजित आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी एकत्र येत सांगाती संस्था स्थापन केली. पुण्यात स्थापन झालेली ही संस्था राज्यभर काम करते आहे.

रुग्णाला वेळेत, तेही नेमके उपचार आणि त्या काळात त्याला सारी मदत करण्याचं ध्येय उराशी बाळगून या संस्थेचे कार्यकर्ते धडपडत आहेत. डॉ. सुजित निलेगावकर हे या संस्थेचं नेतृत्व करतात. त्यांच्या सोबतीला डॉ. योगेश्वरी देशमुख, दीपांजली गावडे, डॉ. सचिन पळणीटकर, डॉ. नीलेश कुरवाळे, सचिन भापकर, अमित तेली, जागृती अयाचित अशी बरीच मंडळी आहेतच; पण त्याहीपलिकडे त्यांच्या कामामुळे अनेक जण स्वयंस्फूर्तीनं त्यांच्यासोबत जोडले गेले आहेत. या टीममध्ये अनेक जण डॉक्टर आहेत. साहजिकच, त्यांचा रुग्ण आणि एकूणच वैद्यकीय क्षेत्राशी खूप निकटचा संबंध आहे.

त्यामुळे त्यांना अनेकांच्या समस्येशी थेट भिडता येतं अन् ती सोडवताही येते. संस्थेच्या उद्देशाला साजेसा 'सांगाती' या नावावरूनच त्यांच्या कार्याची कल्पना येते.

रुग्ण, त्यांचे कुटुंब, त्यांच्या समस्या यापलिकडेही अनेक जणांना मदतीचा हात देण्याचं काम ही संस्था करते. आर्थिक परिस्थिती बेताचीच असलेल्या; पण कुस्तीसारखा रांगडा खेळ खेळताना दुखापतग्रस्त ८७ मल्लांवर डॉ. शिरीष पाठक यांनी 'सांगाती'च्या माध्यमातून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया केल्या आहेत. 'गरीब पैलवानांना मदतीचा हात देणारी अंडी' अशाप्रकारचा उपक्रम राबवणारी सांगाती ही एकमेव संस्था!

कधी पत्र्याच्या खोलीत गारठणारी ८० अनाथ मुलंही त्यांना अस्वस्थ करतात; मग त्यांच्यासाठी अमेरिकेत राहणाऱ्या ओळखीच्या माणसाला साकडं घातलं जातं आणि त्यांनी दिलेल्या पैशातून या मुलांसाठी ब्लँकेट पाठवली जातात. मोखाडासारख्या आदिवासी भागात राबवला जाणारा 'आरोग्य यान' हा उपक्रमही अनोखा. या उपक्रमामुळं आरोग्य सुविधांपासून वंचित रुग्णांना दारोदारी जाऊन उपचार दिले जातात. याची व्याप्ती महाराष्ट्रभर तर आहेच; पण तमिळनाडूसारख्या इतर राज्यांतही ती पसरली आहे. तिथं 'क्विक हील' फाउंडेशनच्या अनुपमा काटकर, अजय शिर्के यांच्यामार्फत हमीरपूरसारख्या दुर्गम भागात ८ ॲम्ब्युलन्स क्लिनिक देण्याचं काम संस्थेनं केलं आहे. तिथल्या आदिवासी भागात राबवलेला हा पायाभूत प्रकल्प वाशीमसारख्या दुर्गम भागातही राबविण्यात आला.

मध्यंतरी प्राज भिलारे आणि माती गणपती मंडळाच्यापुढाकारानं 'सांगाती'नं चिपळूणमध्ये तसेच महाडमधल्या पूरग्रस्तांसाठीही मदत केली. आधी अन्नधान्याची पाकिटं दिल्यानंतर संसारोपयोगी वस्तूंचं वितरण करण्याचं ठरलं. त्यातून एका गावासाठी मदतनिधी उभारण्याचं उद्दिष्ट होतं, तिथं दोन गावांची मदत होईल इतकी सोय झाली. पुण्यातील प्रसिद्ध ऑंकोलॉजिस्ट डॉ. पद्मज कुलकर्णी यांनी तर २८ घरांच्या संपूर्ण गावाला लागेल इतका निधी दिला. सुशील देशमुख यांनी ५० वॉटर फिल्टर्सचा मोठा खर्च उचलला. सर्वांच्या देणगीतून सांगाती ५० घरांमध्ये मदत पोहचवू शकली. या सर्व उपक्रमांत राघवेंद्र इटकर यांनी सामानाच्या जुळवाजुळवीपासून सर्व भांडीकुंडी व्यवस्थित पॅक करण्यापर्यंत सारी मदार उचलली.

या संस्थेकडून पालघर जिल्ह्यातल्या मोखाडा इथंही मोठं काम सुरू आहे. मोखाड्यात आदिवासींच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. वर्षाताई परचुरे यांच्या साहाय्याने तिथं आरोग्य, शिक्षण आणि ग्रामविकास या त्रिसूत्रीनं आदिवासी समाजाला प्रगतिपथावर आणण्यासाठी डॉ. सुजित आणि त्यांची टीम सतत कार्यरत आहे. अशा संस्थेचं काम समाजासाठी पणतीतल्या ज्योतीच्या प्रकाशाएवढं असलं, तरी अनेकांच्या आयुष्यातील अंधार दूर करणारं ठरतं, एवढं नक्की!